**राज्यातील इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना उत्पन्न मर्यादा वाढ करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**इतर मागास बहुजन कल्याण विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : शिवृत्ती २०२१/प्र.क्र.२६/शिक्षण**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई
दिनांक :- २२ मार्च,२०२१

**वाचा :-** १) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र. विजाभ २००५/ प्र.क्र.३७/मावक-३, दि. २१/०१/२००८
२) केंद्र शासनाची मार्गदर्शक सूचना सप्टेंबर, २०१८.

**प्रस्तावना :-**

इतर मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थ्यांना भारत सरकारकडून दिल्या जाणाऱ्या मॅट्रिकेत्तर शिष्यवृत्ती योजनेच्या मार्गदर्शक सूचना सप्टेंबर, २०१८ अन्वये विद्यार्थ्यांच्या पालकांच्या उत्पन्न मर्यादेत केंद्र शासनाने रु.१.०० लाख ( अक्षरी रक्कम रुपये एक लाख फक्त) वरुन रु. १.५० लाख (अक्षरी रक्कम रुपये दीड लाख फक्त) अशी वाढ केलेली आहे. सदर उत्पन्न मर्यादेतील वाढ राज्यात लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

इतर मागासवर्गायांसाठी भारत सरकारची मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना (केंद्र पुरस्कृत योजना) या योजनाचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांची उत्पन्नाची मर्यादा रु.१.०० लाख ( अक्षरी रक्कम रुपये एक लाख फक्त) वरुन रु. १.५० लाख (अक्षरी रक्कम रुपये दीड लाख फक्त) इतकी करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या इतर मागासवर्गीयांच्या यादीत राज्यातील बहुतांशी विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील जातींचा समावेश आहे. त्यामुळे सदरचा शासन निर्णय विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील असलेल्या मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेसाठी लागू राहील.

२. सदर शासन निर्णय केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे व केंद्र शासनाने लागू केलेल्या निर्देशाप्रमाणे राहतील.

३. पुढील आदेश होईपर्यंत विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत उर्वरीत अटी व शर्ती संदर्भीय दि. २१/०१/२००८ शासन निर्णयासोबतच्या केंद्र शासनाच्या नियमावली प्रमाणे राहतील.

४. यासाठी होणारा खर्च विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्गासाठी असलेल्या शालांत परीक्षोत्तर मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती या योजनेसाठी असलेल्या प्रधान शिर्षाखाली संबंधीत आर्थिक वर्षात उपलब्ध करुन दिलेल्या अनुदानातून तसेच पुरवणी मागणीद्वारे उपलब्ध करुन दिलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२१०३२६१३२६०६६९२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(अजित जगताप)**

**कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव.
४. मा. राज्यमंत्री, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव.
५. मा. मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव.
६. मा. मंत्री, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव.
७. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव.
८. मा. मंत्री, कृषी व प.दु.म विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
९. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१०. अपर मुख्य सचिव, कृषी व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. अपर मुख्य सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. प्रधान सचिव (प.दु.म.), कृषी व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालयीन सर्व विभाग.
१७. आयुक्त, समाज कल्याण, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१८. संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१९. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२०. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२१. महासंचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
२३. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
२४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२५. सर्व प्रादेशिक उपायुक्त/सहायक आयुक्त, समाजकल्याण विभाग.
२६. निवासी लेक्षा परिक्षा अधिकारी, मुंबई.
२७. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
२८. कक्ष अधिकारी, विधानमंडळ इतर मागासवर्ग कल्याण समिती, विधानभवन, मुंबई.
२९. निवड नस्ती (कार्यासन-शिक्षण).